**दिनांक : १९/४/२४**

**विषय : पंच समिती च्या पुनर्निर्माण कमिटी ची बिल्डर चे आर्किटेक्ट श्री प्रमोद डुबे यांच्या बरोबर आज झालेली मीटिंग.**

आज दुपारी पंच समिती च्या पुनर्निर्माण समिती सदस्यांची (प्रदीप नेवाळकर, विजय लेले, अनंत बेदरकर आणि राजाराम जोशी) एक मीटिंग आपल्या पुनर्निर्माण प्रकल्पा चे आर्किटेक्ट श्री प्रमोद डुबे यांच्या बरोबर त्यांच्या ऑफिस मधे झाली. आपल्या पंच समिती सदस्या श्रीमती ऋता बावडेकर, सल्लागार श्री हर्षल कवडिकर आणि बिल्डर प्रतिनिधी श्री संदीप माहेश्वरी पण ह्या मीटिंग ला उपस्थित होते.

ही मीटिंग मुख्य करून आपल्या पुनर्निर्माण प्रकल्पात डुप्लेक्स इमारती चे आर्किटेक्ट ने तयार केलेले  ड्रॉइंग ह्या उप समिती ला दाखविण्यासाठी होती. डुप्लेक्स ची लोकेशन, मागे डुप्लेक्स धारकांनी दिलेल्या सूचना तसेच आज मीटिंग मधे उपस्थितांनी केलेल्या सूचना लक्षात घेउन त्या प्रमाणे सुधारित डिझाईन आर्किटेक्ट डुबे लवकरच सर्व डुप्लेक्स धारकां समोर प्रेझेंटे करणार आहेत. त्यांची तैयारी झाली की प्रेझेंटेशन ची तारीख ठरविण्यात येईल.

मीटिंग नंतर श्री माहेश्वरी यांनी पहिले जे फ्लॅट्स चे डिझाईन प्रेझेंटेशन आर्किटेक्ट ने केले होते त्यावर सभासदांच्या ज्या सूचना / अभिप्राय होते ते त्यांना (माहेश्वरींना) ना देण्याची विनंती केली. आपण ते सर्व पॉइंट्स श्री कवडिकरांना पहिलेच दिले आहेत. आता ते माहेश्वरी यांना ही देत आहोत जेणे करून त्या सर्व प्रश्न / सूचना  विचारत घेऊन करून श्री डुबे परत एक प्रेझेंटेशन आपल्या सर्व सभासदां समोर करतील.

**प्रदीप नेवाळकर**
**पंच समिती साठी**